# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 20/04/2021 (मंगळवार)

(दुपार)

---

### पोलीस स्टेशन सावनेर परिसरात जुगार अडयावरधाड
### पोलिस स्टेशन सावनेर ची कार्यवाही

दिनांक 19/04/2021 रोजी पोलिस स्टेशन सावनेर चे पथक हे पो.स्टे. सावनेर परिसरात पेट्रलिंग करीत असतांना त्यांना खात्रीशीर गुप्त माहितगारामार्फत माहिती मिळाली की, काही इसम हे सावंगी शेतशिवार येथे जुगार खेळत आहे. त्यावरून पोलिस स्टेशन सावनेर चे पथकाने दिनांक 19/04/2021 चे 20:25 वा. ते 21:50 वा. सावंगी शेतशिवारात सार्वजनिक पांदण रस्त्यावर छापा घातला असता आरोपी नामे क्र. 1) प्रफुल्ल सुनिल ताजणे, वय 21 वर्ष, रा. नांदोरी, 2) हेमराज विनायकराव तिबोले, वय 24 वर्ष, रा. होळी चौक, किल्लापुरा, सावनेर, 3) भुवन भगवान बनारसी, वय 23 वर्ष, रा. होळी चौक, सावनेर, 4) विजय गणपत डाखोळे, वय 38 वर्ष, रा. बाजार चौक, सावनेर. 5) प्रविण सुरेश भोंडवे, वय 29 वर्ष, रा. पहलेपार, सावनेर यांना अटक करण्यात आली असून फरार आरोपी नामे 6) विनोद रमेश गुरारीकर (पटेल), रा. पहलेपार, सावनेर, 7) आकाश हिरालाल टिक्कम, रा. पहलेपार, सावनेर, 8) प्रतिक उर्फ लारा भुमेश्वर खोरगडे, रा. पहलेपार, सावनेर, 9) नितीन सहारे, रा. खानगाव, 10) आप्पा माने, रा. तेलगाव/तेलकामठी व 11) मनोज पिंगे, रा. नांदोरी आणि इतर चार ते पाच आरोपी हे 52 तासपत्त्यांवर हारजीतचा जुगार खेळ खेळतांना मिळून आले. आरोपीतांना ताब्यात घेवून त्यांच्या कडून 5,500/—रु. रोख रक्कम, नऊ मोटारसायकल व एक मोपेड किं. 3,10,000/— असा एकुण 3,15,550/— रू. चा मुद्देमाल मिळून आला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनि सागर कांरडे पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम 12 मुंबई जुगार कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील पोउपनि सागर कांरडे, पोलीस स्टेशन सावनेर मो क 7722011228 हे करीत आहे.

सदर कार्यवाही श्री. राकेश ओला पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण, श्री. राहुल माकणीकर अपर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग श्री अशोक सरंबळकर यांचे मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक श्री. मारोती मुळुक, पोलीस उपनिरीक्षक सागर कांरडे, पोलीस हवालदार पांडे, गाडगे, इंगोले व दोन होमगार्ड सैनीक यांनी पार पाडली आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर